## निवडक



**साखळी : लोगो स्पर्धेत प्रथम बक्षीस विजेत्या प्रथमेश जांबोटकर याला बक्षीस प्रदान करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत नगराध्यक्षा सिद्धी प्रभू, उपनगराध्यक्ष आनंद काणेकर, मुख्याधिकारी शिवप्रसाद नाईक व इतर.**

### लोगो स्पर्धेत प्रथमेश जाबोटकर विजेता

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. ९ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना मुख्यमंत्री म्हणून सहा वर्षे पूर्ण झाल्याच्या प्रित्यर्थ साखळी नगरपालिकेतर्फे अखिल गोवा पातळीवर आयोजित करण्यात आलेल्या साखळी नगरपालिकेचा लोगो तयार करण्याच्या स्पर्धेत गावठण साखळी येथील प्रथमेश जांबोटकर याने पहिले पारितोषिक पटकावले. हा प्रथम बक्षीस प्राप्त लोगो आता साखळी नगरपालिकेतर्फे सर्व ठिकाणी वापरात आणला जाणार आहे. असे नगराध्यक्षा सिध्दी प्रभू यांनी सांगितले.

या स्पर्धेतील द्रितीय बक्षीस शिवनंद खेडेकर, तृतीय बक्षीस तुषार वसकर यांना प्राप्त झाले. एकूण २६ जणांनी या लोगो बनविण्याच्या स्पर्धेत सहभाग घेतल होता. या सर्वांचे लोगो नगरपालिकेत लावले जाणार असून प्रथम तीन बक्षिसे मिळालेले लोगो इतरही ठिकाणी वापरण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

या लोगो अनावरण व बक्षीस वितरण सोहळ्यास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, नगराध्यक्षा सिध्दी प्रभू, उपनगराध्यक्ष आनंद काणेकर, नगरसेवक दयानंद बोर्येकर, निकिता नाईक, रियाझ खान, यशवंत माडकर, ब्रह्मानंद देसाई, रश्मी देसाई, दीपा जल्मी, मुख्याधिकारी शिवप्रसाद नाईक व इतरांची उपस्थिती होती.

साखळी नगरपालिकेचा लोगो तयार करण्याची अभिनव स्पर्धा नगरपालिकेने आयोजित करून आमच्या स्थानिक कलाकारांना वाव दिला आहे. या स्पर्धेत तयार करण्यात आलेले लोगो पाहता उत्कृष्ट कला सादरीकरण प्रत्येक स्पर्धकाने केले आहे. स्पर्धा तशी सहज व सोपी नव्हती, तरीही साखळीतीलच कलाकारांना बक्षीस मिळणे हा साखळीतील कलाकारांचा सन्मान आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी म्हटले.

स्वागत नगराध्यक्षा सिद्धी प्रभू यांनी केले. सूत्रसंचालन ब्रिती जल्मी यांनी केले. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे वितरीत करून प्रथम पारितोषिक विजेत्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

---

### संत समाज शिरोड्याचे कार्य उल्लेखनीय : शिवानंद नाईक

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ९ :** सर्व हिंदू जनतेला आपला देव, धर्म व संस्कृती याची माहिती मिळावी समाज संस्कारमय व सुसंस्कृत व्हावा हा संत समागामाचा मूळ हेतू आहे. संत समाज शिरोड्याचे कार्य हे उल्लेखनीय असे आहे. पूज्य ब्रह्मानंद स्वामींनी बहुजन समाजासाठी बटू निर्माण केले तसेच अनेक व्यसनी लोकांना व्यसनमुक्त करून चांगल्या मार्गाला लावले. विद्यमान पिठाधीश्वर पूज्य ब्रह्मेशानंद स्वामींनी हे कार्य जगभर पोचवले आहे. असे मनोगत पंच शिवानंद नाईक यांनी व्यक्त केले. श्री दत्त पद्मनाथ पीठ, संत समाज शिरोडातर्फे काराय येथील कृष्णा पांडुरंग बेतोडकर यांच्या निवासस्थानी दीप प्रज्वलित करून व सद्गुरू नामघोषाने उद्घाटन केले.

कार्यक्रमात अतिथी शिरोड्याचे पंच शिवानंद नाईक, सुनील नाईक उपसरपंच शिरोडा, राखी गावकर पंच शिरोडा, राजू प्रभूगावकर देवस्थान अध्यक्ष, संत समाज शिरोडा अध्यक्ष सुदाम नाईक व इतर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये हिंदू धर्माचे संस्कार, वेद, शास्त्र, पुराण, भगवद्गीता यांचे शिक्षण भक्तांना देण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्तावना सुदाम नाईक व आभार ऋषिकेश नाईक यांनी केले.

---

### खाजने येथील माऊली देवीच्या वर्धापनदिन कार्यक्रमास सुरुवात

*■ टीम दैनिक हेराल्ड*



**पेडणे, दि. ९ :** पेडणे खाजने येथील श्री माऊली देवीचा ५८वा वर्धापनदिन शनिवार दि. १० व ११ असे दोन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता श्री सत्यनारायण महापूजा होणार असून त्यानंतर महाआरती, तीर्थप्रसाद आणि महाप्रसाद होईल.

रात्री ८.३० वाजता श्री माऊली देवीची पालखीतून मिरवणूक काढण्यात येईल. त्यानंतर दीप तुझ्या वंशाचा हे सामाजिक नाटक सादर करण्यात येणार आहे. रविवार दि. ११ रोजी संध्याकाळी ३ वा श्री दुंगेश्वर देवाजवळ श्री सत्यनारायण महापूजा होईल.त्यानंतर सांज विनेश ऑर्केस्ट्रा सादर करण्यात येईल. हा कार्यक्रम खोरली म्हापसा येथील शिवदास विठू पेडणेकर यांनी पुरस्कृत केला आहे.

# भारत-पाक तणावामुळे आयपीएल लांबणीवर

## सामने थांबवण्याच्या निर्णयावर बीसीसीआय स्पष्टीकरण | अंतिम सामना रद्द

**नवी दिल्ली, दि. ९ :**






भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण वातावरणामुळे आयपीएल २०२५ अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. दोन्ही देशांमधील तणाव सतत वाढत आहे आणि लष्कराने जबाबदारी स्वीकारली आहे. यामागे, बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने योग्य असे स्पष्टीकरणही दिले आहे.

मुंबई: भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण वातावरणामुळे आयपीएल २०२५ अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. दोन्ही देशांमधील तणाव सतत वाढत आहे आणि लष्कराने जबाबदारी स्वीकारली आहे. आयपीएलचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होणार होता परंतु देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे तो रद्द करण्यात आला. यामागे, बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने योग्य असं स्पष्टीकरणही दिले आहे.

बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले – देशात युद्ध सुरू असताना आपण क्रिकेट खेळत राहणे चांगले वाटत नाही. याचा अर्थ असा की देशाची सुरक्षा खेळांपेक्षा जास्त महत्त्वाची आहे. लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील सामना ९ मे रोजी एकाना स्टेडियमवर होणार होता. पण आता असे होणार नाही. ८ मे रोजी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील आयपीएल सामनाही सुरक्षेच्या कारणास्तव रद्द करण्यात आला.

८ मे रोजीच, भारतीय सैन्याने रात्री नियंत्रण रेषेवर आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर मोठ्या काउंटर-ड्रोन ऑपरेशनमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी ड्रोन पाडले होते. पाकिस्तानने भारतात ड्रोन पाठवण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला. या घटनांनंतर आयपीएल रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशाची सुरक्षा प्रथम येते म्हणून हा निर्णय घेण्यात आला. खेळ नंतरही होऊ शकतो, पण देश सुरक्षित राहिला पाहिजे. देशातील सध्याच्या वातावरणात क्रिकेट खेळणे योग्य नाही. त्यामुळे आयपीएल २०२५ रद्द करण्यात आली आहे. परिस्थिती सामान्य झाल्यावरच ते पुन्हा सुरू केले जाईल.

यापूर्वी, आयपीएल प्रमुख अरुण धुमल यांनी काल रात्री एका निवेदनात म्हटले होते – आम्ही सरकारच्या सूचनांची वाट पाहत आहोत. लवकरच निर्णय घेतला जाईल. अरुण धुमल यांच्या गृहनगर धर्मशाला येथे पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना १०.१ षटकांनंतर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, भारतीय कर्णधार रोहित शर्मानेही भारतीय सैन्याला पाठिंबा दिला आहे. आता आयपीएलचे १६ सामने बाकी आहेत.

### आयपीएल अनिश्चित काळासाठी स्थगीत

**बीसीसीआयने आयपीएल अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र ही स्पर्धा पुन्हा केव्हा सुरू होणार याबाबत कुठलीही अपडेट समोर आलेली नाही. तणावाची परिस्थिती पाहता, आयपीएल लवकर सुरू होणार नाही हे तर स्पष्ट आहे. मात्र, बीसीसीआयसमोर आयपीएलचे उर्वरीत सामने खेळण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत. आयपीएलचा फायनलचा सामना २५ मे रोजी होणार होता. मात्र आता ही स्पर्धा पुढे ढकलली आहे.**

## शुकरी कॉनराड दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रशिक्षक

- **२०२७च्या वनडे विश्वचषकापर्यंत जबाबदारी**
- **एस- ला डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत पोहोचवले**

**नवी दिल्ली, दि. ९ :**



दक्षिण आफ्रिकेचे माजी खेळाडू शुकरी कॉनराड यांची क्रिकेट साउथ आफ्रिका (सीएस) ने सर्व फॉरमॅटचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. यापूर्वी, संघाचे व्हाईट-बॉल प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉनराड यांना कसोटी आणि एकदिवसीय प्रशिक्षकपदाची भूमिका देण्यात आली होती.

२०२७ मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या विश्वचषकापर्यंत कॉनराड संघाचे प्रशिक्षकपद भूषवतील. शुक्रवारी, क्रिकेट साउथ आफ्रिकेने सोशल मीडिया एक्सवर ही माहिती दिली. कॉनराड यांच्या प्रशिक्षणाखाली आफ्रिका प्रथमच जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे.

क्रिकेट साउथ आफ्रिकाने पोस्ट केले की, आम्हाला शुकरी कॉनराड यांची प्रोटीयाज पुरुष संघाच्या सर्व-फॉर्मेट मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती जाहीर करताना आनंद होत आहे. जानेवारी २०२३ पासून कसोटी संघाचे प्रशिक्षकपद भूषवणारे कॉनराड आता जुलैमध्ये झिम्बाब्वे आणि न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या टी२० तिरंगी मालिकेपासून व्हाईट-बॉल फॉरमॅटमध्ये जबाबदारी स्वीकारतील. ५८ वर्षीय कॉनराड हे दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२७ पर्यंत सर्व प्रकारच्या राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करतील.

कॉनराड म्हणाले, कसोटी संघाचे प्रशिक्षण देणे हे माझ्या क्रिकेट प्रवासातील सर्वात मोठे आकर्षण राहिले आहे आणि आता मी पांढऱ्या चेंडूच्या संघांचे निरीक्षण करण्यास उत्सुक आहे. आफ्रिकेत पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये अनेक प्रतिभावान खेळाडू आहेत. मला वाटते की काहीतरी खास साध्य करण्यासाठी आपल्याकडे सर्वकाही आहे.

ते पुढे म्हणाले, आमचे पुढे एक व्यस्त वेळापत्रक आहे, पुढील महिन्यात होणाऱ्या थढ्ढ फायनलपासून सुरुवात होईल. त्यानंतर आपल्याला टी-२० विश्वचषक आणि एकदिवसीय विश्वचषक खेळायचे आहे.

कॉनराड यांच्या प्रशिक्षणाखाली दक्षिण आफ्रिकेने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. संघ ११ जूनपासून लॉर्ड्सवर ऑस्ट्रेलियाशी सामना करेल. आफ्रिकेने डब्ल्यूटीसी पॉइंट्स टेबलमध्ये पहिले स्थान पटकावले. संघाचे १२ सामन्यांत ८ विजय आणि ३ पराभवांसह १०० गुण होते.

## आयपीएस संघ हिमाचलमधून रवाना

**धर्मशाळा, दि. ९ :**

पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर आज प्रशासनाने हिमाचलमधून पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्सचे संघ पाठवले. काल धर्मशाला येथे आयपीएलचा सामना मध्यभागी थांबवावा लागला. राज्यातील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन बीसीसीआयने विशेष वंदे भारत ट्रेनची व्यवस्था केली.

या ट्रेनमधून सुमारे ३०० लोक प्रवास करत आहेत. यामध्ये खेळाडू, तांत्रिक संघ, माध्यम कर्मचारी आणि कार्यक्रमाशी संबंधित कर्मचारी यांचा समावेश आहे. सुरक्षा आणि वेळेची कमतरता लक्षात घेऊन बीसीसीआयने हे पाऊल उचलले आहे. सुरक्षा एजन्सींशी समन्वय साधल्यानंतर या विशेष ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सध्याच्या परिस्थितीत रस्त्याने प्रवास करण्याबाबत अनिश्चितता आहे. म्हणून विशेष ट्रेन हा एक सुरक्षित पर्याय मानला जात होता. बीसीसीआयच्या अधिकाऱ्याच्या मते, प्रत्येकाची सुरक्षा ही त्यांची पहिली प्राथमिकता आहे. या कारणास्तव, ही व्यवस्था राज्य प्रशासन आणि रेल्वे विभागाच्या सहकार्याने करण्यात आली. आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच बीसीसीआयने दोन्ही संघ आणि प्रसारण पथकासाठी विशेष ट्रेनची व्यवस्था केली आहे.

## रावळपिंडीत होणारा पीसीएल सामना रिशेड्यूल

**रावळपिंडी, दि. ९ :**

गुरुवारी रावळपिंडी येथे होणारा कराची किंग्ज आणि पेशावर झल्मी यांच्यातील सामना भारतीय ड्रोन हल्ल्यानंतर पुन्हा रिशेड्यूल करण्यात आला आहे. भास्करच्या सूत्राने सांगितले – फक्त आजचा सामना पुन्हा वेळापत्रकबद्ध करण्यात आला आहे. तथापि, नवीन ठिकाण आणि वेळेबद्दल अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. त्यांनी सांगितले की पीएसएल हलवण्याबाबतही चर्चा सुरू आहे, परंतु अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

वृत्तसंस्था आयएएनएसने एका माजी क्रिकेटपटूच्या हवाल्याने म्हटले आहे की, 'परदेशी खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे. अनेक खेळाडू आता शक्य तितक्या लवकर देश सोडण्याचा प्रयत्न करत आहेत. पीसीबी अधिकाऱ्यांनी उर्वरित पीएसएल सामने कराची, दोहा आणि दुबई येथे हलविण्याची शिफारस केली आहे. सरकारशी सल्लामसलत केल्यानंतर पीसीबी कोणताही निर्णय घेईल. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत प्रत्युत्तर म्हणून, एक भारतीय ड्रोन रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर पडला, ज्यामुळे स्टेडियमचे नुकसान झाले, जरी पाकिस्तान सरकारने हे वीज पडल्यामुळे घडले असे म्हटले.

## 'प्रकाशस्तंभ' पुस्तकाचे प्रकाशन

*■ टीम दैनिक हेराल्ड*




**कोरगाव : पुस्तक प्रकाशनास डॉ. मनोज कामत, प्रा. अनिल सामंत, रामा शेट्ये, सुहास नाईक, उजवीकडे रमेश वंसकर, रामनाथ शेट्ये व राजमोहन शेट्ये.**

**पेडणे, दि. ९ :** राजमोहन शेट्ये यांचे 'प्रकाशस्तंभ' हे ३ रे पुस्तक कोरगाव येथील श्री साळेश्वर मंदिरात नुकतेच प्रकाशित झाले.

यावेळी गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत, धेंपे कॉलेजचे प्राचार्य डॉ. मनोज कामत, गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे अध्यक्ष रमेश वंसकर, शिवशक्ती संघाचे अध्यक्ष सुहास नाईक, देवस्थान समितीचे अध्यक्ष रामा शेटये, वडील रामनाथ शेट्ये, पत्रकार मयुरेश वाटवे, उदय देशप्रभु, दादू परब अशी अनेक दिग्गज मंडळी या कार्यक्रमास उपस्थित होती.

अगत्य, सुजाण अशा साहित्यिक आणि श्रोत्यांची गर्दी आणि उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभलेल्या या सोहळ्याची सुरवात सुमेधस राजमोहन शेट्ये व स्वानंदी तेजेश शेट्ये यांच्या सुरेल अशा स्वागत गीताने झाली. प्राचार्य अनिल सामंत यांनी दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी पुस्तकावर भाष्य करताना डॉ. मनोज कामत यांनी राजमोहन शेट्ये ही एक स्वच्छंदी लेखक आहे, असे नमूद केले. त्याचे हे स्वच्छंदी लेखन अनेकांना भावले आहे म्हणूनच उत्स्फूर्त असा या पुस्तक प्रकाशनास प्रतिसाद लाभला, हे खऱ्या अर्थाने त्यांच्या साहित्याची मिळकत आहे. पेरणी तालुक्याला सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक वाटचाल म्हणून जो प्रामाणिक स्वच्छंद विचाराने व्यक्त झाला. आज याच मांदियाळीत राजमोहन विराजमान झाला आहे. त्याच्यात असलेली सृजनशीलता, सौजन्यशीलता त्याच्या लिखाणातही दिसून येते म्हणून तो वाचक प्रिय झालाय हे मी आवर्जून नमूद करतो. आजच्या काळात वाचक मिळवणे सोपे काम नसून ते आपल्या ओघवत्या शैलीने ते मिळवले आहे, हे त्याचे परिश्रम आहेत. त्याना भावी वाटचालीस शुभेच्छा, असे प्रतिपादन डॉ. मनोज कामत यांनी केले.

प्रा. अनिल सामंत म्हणाले की, राजमोहनचा चांगुलपणा हा त्याच्या लिखाणाचा गाभा आहे. आज सगळीकडे निराशजनक स्थिती असताना अशा परिस्थितीत अंधार भेदणारा प्रकाश निर्माण करण्याचे सामर्थ्य हा लेखक ठेवतो हे आशावादी वाटते. प्रकाशस्तंभ हे पुस्तक अनेकांना प्रेरणा देणारे वाटते. त्याचा पाया मजबूत आहे म्हणून तो असा हा सुंदर मनोरा बांधत सुटला आहे. आपले कुटुंब, घर वाडा, गाव ते राज्य या भोवती त्याचं एक सूत्र लेखन खरोखरच नव्या पिढीला मार्गदर्शक तत्व आहे. त्याच्या लेखात केवळ समस्या दिसत नसून, वाट दाखवणारी समस्यांची उत्तरे तुम्हाला सापडतील. पुढील त्याच्या अशाच धैर्यशील लेखनास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

रमेश वंसकर यांचेही मनोगत झाले. कार्यक्रमास जमलेला जनसमूह हे राजमोहनचे मिळवलेले यश वाटते हीच स्फूर्ती घेऊन पुढे अनेक साहित्य निर्मिती तो करेल यात शंका नाही. हा एक बिलंदर कलाकार असून चित्रकलेतही गोमंतकात चमकत आहे. अनेक पुस्तकांना त्यांनी रेखाटलेली मुखपृष्ठे आणि रेखाचित्रे शोभविंत आहेत. त्यांचे साहित्यही निर्मळ आहे म्हणून ते लोकप्रिय ठरत आहे. त्याला भरभरून अशा शुभेच्छा.

सोनाली धीरज परब हिने पुस्तकास साजेस सूत्रसंचालन करून कार्यक्रम आणखी सुशोभित केला. परेश परवार, चंद्रकांत सांगळे, सुमेधस शेटये, स्वानंदी शेटये,चंद्रकांत सावळदेसाई, आनंद परब, गोपाळ शेटये, सखाराम शेट्ये, शाश्वेत शेटये आदींनी गुलाबपुष्प प्रदान आणि विशेष सहकार्य केले. आभार शिवशक्ती संघाचे सचिव उमेश गाड यांनी मानले.

## कासारपाल येथील विद्यार्थ्यांचे कराटे चॅम्पियनशिपमध्ये यश

*■ टीम दैनिक हेराल्ड*



**फोंडा : कराटे स्पर्धेत यश संपादन केलेले कासारपाल येथील सृजन प्रभुदेसाई, वेदा मराठे, ऐश्वर्या परब. सोबत प्रशिक्षक प्रशांत जाधव व मुख्य प्रशिक्षक विष्णू नाईक.**

**साळ, दि. ९ :** फोंडा येथे आयोजित केलेल्या ओकिनावा मार्शल आर्ट्स अकादमी गोवातर्फे ३री व ओकिनावा इनविटेशनल कराटे चॅम्पियनशिपचे आयोजन चीफ इन्स्ट्रक्टर सुरेखा कुंकळीकर यांनी केले. या स्पर्धेमध्ये दोनशेहून अधिक कराटेपटूंनी सहभाग घेतला होता. ही कराटे स्पर्धा फोंडा येथील इनडोअर स्टेडियम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये कासारपाल येथे प्रशिक्षण घेणाऱ्या कराटेपटूंनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत कासारपाल येथे सुरू असलेल्या कराटे क्लासमधून कराटेपटूंनी सहभाग घेतला होता. यात कु.सृजन प्रभुदेसाई याने सुवर्ण पदके मिळविली, वेदा मराठे हिने रौप्य पदके मिळविली. तसेच .ऐश्वर्या परब हिने कांस्य पदके मिळवली. या स्पर्धेचे आयोजक, उपस्थित मान्यवर तसेच इतर कराटे चीफ इन्स्ट्रक्टर्स यांच्या हस्ते या सर्व कराटेपटूंचे स्वागत करून त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या सर्व कराटेपटूंना मुख्य प्रशिक्षक विष्णू नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. कासारपाल कराटे क्लासचे प्रशिक्षक प्रशांत जाधव हे कराटेपटूंना प्रशिक्षण देत आहेत. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्याबद्दल सर्व पालकांनी त्यांचे आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 247 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .